# बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचा दीक्षांत सोहळा

## विविध सेवा पुरस्कार प्रदान, 'रिफ्लेक्सीस'चे संस्थापक प्रशांत पलाकुर्ती यांना बिट्स रत्न पुरस्कार

प्रतिनिधी
वास्को

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसच्या सभागृहात दीक्षांत सोहळा नुकताच झाला. यप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. राजेश गोखले उपस्थित होते.

व्यासपीठावर बिट्स पिलानीचे कुलगुरु डॉ. कुमार मंगलम् बिर्ला, उपकुलगुरु प्रा. सौविक भट्टाचार्य, प्रशासक मंडळाचे सदस्य दिलीप गौर, बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू व संचालक प्रा. सुधीर कुमार बराई, दुबई कॅम्पसचे संचालक श्रीनिवास मडापुसा, बिट्स पिलानीचे रजिस्ट्रार कर्नल एस. चक्रवर्ती (निवृत्त) तसेच सिनेट सदस्य, गोवा कॅम्पसचे प्राध्यापक, कर्मचारी, मान्यवर, पदवीधर विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉ. राजेश गोखले यांनी बिट्स पिलानी विद्यापीठाच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल अभिनंदन केले. आपल्या राष्ट्राला जागतिक शक्ती म्हणून स्थान मिळवून देण्यासाठी कार्यरत राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कुलगुरु डॉ. कुमार मंगलम् बिर्ला यांनीही मार्गदर्शन केले. उपकुलगुरु प्रा. सौविक भट्टाचार्य यांनी विद्यापीठाच्या कार्याची माहिती दिली. संचालक प्रा. सुमन कुंडू यांनी बिट्स पिलानी गोवाचा अहवाल सादर केला.

पदक विजेत्यांमध्ये जगताप निशांत नानासाहेब (सुवर्णपदक), यश जोशी (रौप्यपदक) व आर्यन संजय ओचानी यांचा समावेश होता. यावर्षी १०२९ विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली. यात ३६ डॉक्टरेट, १५७ एमई, ४ एमफिल, ५९३ बीई व २३९ एमएससी पदवीप्राप्त विद्यार्थी आहेत.




सांकवाळ : दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे डॉ. राजेश गोखले, डॉ. कुमार मंगलम् बिर्ला, दिलीप गौर, प्रा. सौविक भट्टाचार्य, प्रा. सुमन कुंडू व इतर मान्यवर.

जे. सी. चौधरी व डायझ नेसामोनी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. रिफ्लेक्सीस सिस्टमचे संस्थापक प्रशांत पलाकुर्ती यांना पहिला बिट्स रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यात टफ्टसू विद्यापीठाचे प्रा. प्रा. समीर सोनकुसळे, न्यूयॉर्क विद्यापीठाचे उपडीन प्रा. नासिर मेमन, व्हार्टन स्कूलचे प्राध्यापक प्रा. कार्तिक होसनगर, टेक्सास ए अॅण्ड एम विद्यापीठाचे प्रा. अरूल जयरामन, प्रमाद जंध्याला, जे. सी. चौधरी, भुवन गुप्ता, डॉ. जगदीश बाबू रंगीसेट्टी, समय कोहली, आकाश गुप्ता, डॉ. थॅम्पी थॉमस, सुशील कुमार रूंगटा, प्रा. विवेक पॉल, लेखक डॉ. विक्रम संपत, प्रा. टी. एन. विजय कुमार, प्रा. पद्मनाभन सेशायर, प्रा. मल्ला राघव राव, नंदन रेड्डी, डायस नेसोमनी, श्रीहर्ष मेजेती, अभिनय अस्थाना, अभिजीत काणे, टी.एम. विजय भास्कर, सुकुमार रंगनाथन, रंजन कुमार महापात्रा, रामकृपा अनंतन, प्रतिक पोटा, प्रा. मदत पिल्लुतला, प्रा. मिलिंद तांडे, प्रा. कृष्णन बालसुब्रह्मण्यम, प्रा. गेरार्ड जॉर्ज, प्रा. आदित्य माथूर, जयन रमण कुट्टी, राकेश वर्मा, सुनील नंदा, अनुराग जैन, सुभाष मल्होत्रा, रेवती अद्वैथी, किशोर राजवंशी यांना पुरस्कार देण्यात आले. भारतीय लष्करातील कॅप्टन रवीशंकर यांना मरणोत्तर विशिष्ट सेवा पुरस्कार देण्यात आला. विशिष्ट सेवा पुरस्कार प्राप्तमध्ये एम.पी. शर्मा, रामास्वामी नागरत्न, श्रीकांत कृष्णमूर्ती व प्रदीप सेठी यांचा समावेश आहे. बिट्स पिलानी गोवाचे डीन प्रा. डी. एम.कुलकर्णी यांनी आभार मानले.